# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.05.2026** **वारः शुक्रवार**

1. ऑपरेशन सिंदूरच्या वर्षपूर्तीनिमित्त देशभरात भारतीय सैन्याचा गौरव
2. पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचा उद्या शपथविधी
3. आकाशवाणीच्या नव्वद वर्षपूर्तीनिमित्त आज देशभरातील आकाशवाणी केंद्रांच्या वतीनं पदफेरी मॅरेथॉन सह विविध कार्यक्रमांचं आयोजन
4. बदलत्या जागतिक व्यवस्थेत, भारत आणि व्हिएतनामकडं जागतिक पुरवठा साखळीत महत्त्वाची भूमिका बजावण्याची संधी-व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांचं प्रतिपादन
5. देशात 604 लाख टनांहून अधिक अन्नधान्याचा साठा-अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांची माहिती

**ऑपरेशन सिंदूर**

ऑपरेशन सिंदूरला एक वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त काल देशभरात भारतीय सैन्य दलांच्या पराक्रमाचा गौरव करण्यात आला. पहलगाममधल्या दुर्दैवी हल्ल्याला भारतीय सैन्यानं योग्य प्रत्युत्तर दिलं असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या. भारताची शांतता, एकता आणि सार्वभौमत्वतेला विस्कळीत करण्याच्या प्रयत्न करणाऱ्यांना ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून भारतीय सैन्यदलांनी जोरदार आणि योग्य प्रत्युत्तर दिल्याचं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी सांगितलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या अतुलनीय कामगिरीबद्दल संपूर्ण देश भारतीय सैन्याला अभिवादन करत असल्याचं सांगून या कामगिरीतून भारतीय सैन्याची व्यवसाय-कुशलता, तयारी आणि समन्वय दिसून येतो असं समाजमाध्यमांवरील आपल्या संदेशात सांगितलं. पाकिस्तानातही दहशतवाद्यांचे अड्डे सुरक्षित नाहीत हे ऑपरेशन सिंदूरमधून स्पष्ट झालं आणि ही फक्त सुरुवात होती अशी प्रतिक्रिया भारतीय लष्करानं ऑपरेशन सिंदूरच्या वर्षपूर्तीच्या निमित्तानं दिली आहे.

**अमित शाह**

पश्चिम बंगालचे नवे मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळाचा शपथविधी उद्या रवींद्रनाथ टागोर यांच्या जयंतीदिनी होणार आहे. राज्यपाल आर.एन. रवी यांनी काल पश्चिम बंगालची विधानसभा विसर्जित केली. कोलकाता इथल्या 'ब्रिगेड परेड ग्राउंड'वर शपथविधी समारंभाची तयारी सुरू असून, या सोहळ्यासाठी कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात केली जात आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे ज्येष्ठ नेते आणि इतर राज्यांचे मुख्यमंत्री या शपथविधी समारंभाला उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे. दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज कोलकाता इथं नवनिर्वाचित भाजप आमदारांची बैठक घेणार असून, यावेळी पक्षाच्या विधिमंडळ नेत्याची निवड केली जाणार आहे.

**तमिळनाडू**

तमिळनाडूमध्ये, नवीन सरकार स्थापनेसाठी राज्यातील राजकीय हालचालींना वेग आला आहे. बहुमत सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेला 118 चा आकडा गाठण्याबाबत विविध राजकीय पक्षांच्या चर्चा सुरू आहेत. काल, द्रविड मुनेत्र कळघम अर्थात डीएमके आणि एआयए डीएमके या दोन्ही पक्षांनी आपल्या नवनिर्वाचित आमदारांच्या बैठका घेतल्या. राज्यपाल विश्वनाथ आर्लेकर यांनी केलेल्या मागणीनुसार, व्हीसीके, सीपीआय आणि सीपीआयएम या पक्षांच्या नवनिर्वाचित आमदारांची एक महत्त्वपूर्ण बैठक आज होणार असून, या बैठकीत सर्वात मोठा पक्ष असलेल्या टीव्हीकेला पाठिंबा देण्याबाबत निर्णय घेतला जाण्याची शक्यता आहे.

**पदफेरी**

आकाशवाणीच्या नव्वद वर्षपूर्तीनिमित्त देशभरातील आकाशवाणी केंद्राच्या वतीनं पदफेरी मॅरेथॉन सह विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. आकाशवाणी पुणे केंद्रातर्फे आज सकाळी केंद्र कार्यालयापासून शनिवारवाड्यापर्यंत पदफेरीचं आयोजन करण्यात आलं असून, यामध्ये मोठ्या संख्येनं कर्मचारी सहभागी झाले आहेत.

**भारत-व्हिएतनाम व्यापार मंच**

आजच्या बदलत्या जागतिक व्यवस्थेत, जागतिक पुरवठा साखळीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावण्याची एक मोठी संधी भारत आणि व्हिएतनाम या दोन्ही देशांकडे एकत्रितपणे उपलब्ध आहे, असं मत व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांनी मुंबईत काल झालेल्या 'भारत-व्हिएतनाम व्यापार मंचाच्या कार्यक्रमात व्यक्त केलं. त्यांनी भारतीय कंपन्यांना-विशेषतः अत्याधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत असलेल्या कंपन्यांना-व्हिएतनाममध्ये गुंतवणूक करण्याचं निमंत्रण दिलं. भूतकाळात दोन्ही देशांनी परस्पर सहकार्याच्या बळावर अनेक आव्हानांचा सामना केला आहे. व्हिएतनामचे माजी राष्ट्राध्यक्ष 'हो ची मिन्ह' आणि भारताचे माजी पंतप्रधान 'जवाहरलाल नेहरू' यांसारख्या दूरदृष्टी असलेल्या नेत्यांनी दोन्ही देशांमधील संबंध दृढ करण्यासाठी प्रयत्न केले. या राजकीय विश्वासाच्या बळावर 2016 पासून द्विपक्षीय संबंधांनी नवी शिखरे गाठली आहेत, असंही लाम यांनी नमूद केलं.

**भारत-त्रिपक्षीय बैठक**

भारताचे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी काल अबुधाबी इथं भारत, फ्रान्स आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील त्रिपक्षीय बैठकीत सहभाग घेतला. यावेळी त्यांच्यासोबत संयुक्त अरब अमिरातीच्या परराष्ट्र राज्यमंत्री आणि भारतासाठीच्या विशेष दूत रीम अल हाशिमी, तसेच फ्रान्सच्या युरोप आणि परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सरचिटणीस मार्टिन ब्रिएन्स उपस्थित होते. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, या तीनही देशांनी आपली भागीदारी अधिक बळकट करण्यावर आणि स्पष्ट कालमर्यादा असलेली एक कृती योजना तयार करण्यावर सहमती दर्शवली. या भेटीदरम्यान, मिस्री यांनी 'मुबादला इन्व्हेस्टमेंट कंपनी'चे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी खालदून अल मुबारक यांचीही भेट घेतली आणि गुंतवणूक सहकार्याबाबत चर्चा केली. तत्पूर्वी मिस्त्री यांनी संयुक्त अरब अमिरातीच्या आंतरराष्ट्रीय सहकार्य राज्यमंत्री रीम अल हाशिमी यांच्याशी चर्चा केली आणि भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यात वाढत असलेल्या धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेतला.

**जोशी-अन्नधान्याचा साठा**

देशातील सरकारी अन्नधान्याचा साठा 604 लाख टनांहून अधिक झाला आहे; हा साठा अनिवार्य सुरक्षित साठ्याच्या गरजेपेक्षा जवळपास तिप्पट आहे, अशी माहिती अन्न आणि सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांनी समाज माध्यमावरील संदेशाद्वारे दिली आहे. गहू आणि तांदळाच्या या भक्कम साठ्यामुळे देशभरातील कल्याणकारी योजना आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेसाठी अन्नधान्याचा अखंड पुरवठा होईल. अन्नधान्याची प्रभावी खरेदी, पिकांचे उत्तम उत्पादन आणि शेतकऱ्यांना मिळणारा सातत्यपूर्ण पाठिंबा यामुळे देशाची अन्न सुरक्षा, शेतकरी कल्याण आणि एका सुदृढ भविष्याप्रती असलेली कटिबद्धता अधिकच बळकट होत आहे, असंही जोशी यांनी म्हटलं आहे.

**युद्ध विराम**

दुसऱ्या महायुद्धात सोव्हिएत संघाच्या विजयाच्या 81 व्या वर्धापनदिनानिमित्त होणाऱ्या सोहळ्यादरम्यान, रशियाने युक्रेनसोबत सुरू असलेल्या युद्धात आजपासून 10 मे पर्यंत युद्धविरामाची घोषणा केली आहे. राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या निर्णयानंतर रशियन संरक्षण मंत्रालयाने ही घोषणा केली. यावेळी होणाऱ्या संचलनादरम्यान युक्रेनने मॉस्कोवर कोणताही हल्ला केल्यास मध्य कीववर मोठा क्षेपणास्त्र हल्ला होऊशकतो असं रशियानं म्हटलं आहे. जवळपास दोन दशकांत प्रथमच, या वर्षीचे संचलन रणगाडे, क्षेपणास्त्रे आणि इतर अवजड उपकरणांशिवाय आयोजित केलं जाणार आहे. सुरक्षेच्याकारणास्तव देशभरातील अनेक लहान संचलनेदेखील कमी करण्यात आली आहेत किंवा रद्द करण्यात आल्याचं रशियाच्या संरक्षण मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

## अमेरिका

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेले नवे 10 टक्के जागतिक आयातशुल्क बेकायदेशीर असल्याचा निर्णय न्यूयॉर्क इथल्या 'आंतरराष्ट्रीय व्यापार न्यायालया'च्या तीन न्यायाधीशांच्या एका खंडपीठानं दिला आहे. ट्रम्प यांनी व्यापार कायद्यांतर्गत राष्ट्राध्यक्षांना काँग्रेसने दिलेल्या अधिकारांच्या पलीकडे जाऊन कृती केली आहे, असं खंडपीठानं म्हटलं आहे. अनेक लहान उद्योगांनी या शुल्काला न्यायालयात आव्हान दिलं होतं. अमेरिकेतील सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी ट्रम्प यांनी गेल्या वर्षी लागू केलेल्या जागतिक आयातशुल्काला स्थगिती दिल्यानंतर, हे नवं शुल्क लागू करण्यात आले होते. त्यानंतर ट्रम्प प्रशासनानं 24 जुलैपर्यंत हे तात्पुरते 10 टक्के शुल्क कायम ठेवण्यासाठी, '1974 च्या व्यापार कायद्याचे कलम 122' या दुसऱ्या एका कायद्याचा वापर करण्याचा प्रयत्न केला. खंडपीठाचा हा निर्णय ट्रम्प प्रशासनासाठी आणखी एक कायदेशीर पराभव ठरला आहे.

## इंडिया एआय करार

आरोग्यसेवेमध्ये जबाबदार कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानाचा अर्थात एआयचा वेगवान वापर करण्यासाठी इंडिया एआय आणि इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च संस्था अर्थात आयसीएमआरनं काल नवी दिल्लीत एक सामंजस्य करार केला. ही भागीदारी एआयच्या जबाबदार आणि व्यापक वापराद्वारे आरोग्यसेवेचे परिणाम सुधारण्याच्या दिशेनं एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, असं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने म्हटलं आहे. या सहकार्यांतर्गत, दोन्ही संस्था त्यांच्या पूरक सामर्थ्यांचा उपयोग करतील. यात इंडिया एआयच्या संगणकीय पायाभूत सुविधा, डेटासेट प्लॅटफॉर्म आणि एआय कौशल्य विकास उपक्रमांसोबतच आयसीएमआरचे संशोधनातील कौशल्य आणि 'मेडिकल इन्फॉर्मेशन डेटा फॉर एआय सोल्युशन्स' चौकट यांचा समावेश आहे.

## क्रिकेट

आयपीएल क्रिकेटमध्ये, काल रात्री लखनौ इथं पावसामुळं सामन्यात अडथळा आल्यानं 'डीएलएस' पद्धतीचा वापर करून लखनौ सुपर जायंट्सनं रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला 9 धावांनी पराभूत केलं.विजयासाठी 213 धावांचं आव्हान समोर असताना, रॉयल चॅलेंजर्सने 203 धावा केल्या. तत्पूर्वी, प्रथम फलंदाजी करताना लखनौ सुपरजायंट्सनं 19 षटकांत 3 गड्यांच्या बदल्यात 209 धावा उभारल्या होत्या. पावसामुळे वारंवार व्यत्यय आल्याने हा सामना प्रत्येकी 19 षटकांचा करण्यात आला आणि बंगळुरू संघासमोर 'डीएलएस'नुसार 213 धावांचे सुधारित लक्ष्य ठेवण्यात आलं. लखनौ संघाकडून मिचेल मार्शने 56 चेंडूंत 111 धावांची खेळी केली, तर बंगळुरूसाठी रजत पाटीदारने 31 चेंडूंत 61 धावांचे योगदान दिले. मिचेल मार्शला 'सामनावीर' म्हणून गौरवण्यात आले. आज, दिल्ली कॅपिटल्स आणि कोलकाता नाईटरायडर्स यांच्यात दिल्लीत सामना रंगणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.